ज्येष्ठ कवी वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा दिनांक २७ फेब्रुवारी हा जन्मदिवस, “मराठी भाषा गौरव दिन” म्हणून साजरा करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांकः मभादि-१०१५/प्र.क्र.१८/२०१५/भाषा-३,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
**तारीख: २५ फेब्रुवारी, २०१५.**

**वाचा :** मराठी भाषा विभाग, शासन निर्णय क्र.मभादि-१०१२/प्र.क्र.८८/२०१२/भाषा-३, दिनांक २१ जानेवारी, २०१३.

**परिपत्रक :**

श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांनी महाराष्ट्राच्या सांस्कृतिक क्षेत्रामध्ये मोलाचे योगदान दिले असून मराठी भाषा ही ज्ञानभाषा होण्यासाठी अथक परिश्रम घेतले आहेत. आपल्या मातृभाषेबद्दल गौरव म्हणून आणि त्यांच्या स्मृतीला अभिवादन म्हणून श्री.वि.वा.शिरवाडकर उर्फ कुसुमाग्रज यांचा जन्मदिन दिनांक २७ फेब्रुवारी हा दिवस “मराठी भाषा गौरव दिन” म्हणून साजरा करण्याच्या सूचना यापूर्वी दिनांक २१ जानेवारी, २०१३ च्या शासन निर्णयान्वये देण्यात आल्या आहेत. सदर शासन निर्णयास अनुसरुन राज्यातील सर्व मंत्रालयीन विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख यांनी दिनांक २७ फेब्रुवारी रोजी मराठी भाषा व साहित्य विषयक खालील विविध उपक्रम आयोजित करुन समारंभपूर्वक मराठी भाषा गौरव दिन सोहळा साजरा करण्याबाबत पुन्हा सूचित करण्यात येत आहे.

(१) सकस साहित्याची, नव्या माहितीची, आधुनिक विज्ञान व तंत्रज्ञानाची मराठीतील पुस्तके वाचकांपर्यंत पोहोचविण्याच्या हेतूने राज्यभर ग्रंथप्रदर्शन / ग्रंथोत्सव / ग्रंथदिंडी आयोजित करणे.

(२) शाळा / महाविद्यालय / शासकीय व निमशासकीय कार्यालये / खाजगी संस्थांमध्ये विविध स्तरावर स्पर्धा आयोजित करणे.

(३) मराठी भाषा गौरव दिनानिमित्त शासनाच्या विविध उपक्रमांना प्रसिध्दी देणे.

(४) आकाशवाणी व दूरदर्शनवरुन सादर करण्यात येत असलेल्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या प्रायोजित कार्यक्रमामध्ये मान्यवरांच्या मुलाखती, परिसंवाद आयोजित करणे.

(५) राज्यातील सर्व प्राथमिक व माध्यमिक शाळांमधून मराठी भाषा साहित्य आणि संस्कृती विषयक स्पर्धा (निबंध, वक्तृत्व इ.) आयोजित करणे.

कृ.मा.प.

20



२. सर्व मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी व मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आपआपल्या विभागातील कार्यक्षेत्रातील संबंधितांचे सहकार्य घेऊन हा सोहळा पार पाडण्यासाठी सर्व अधिकारी / कर्मचारी यांना सहभागी करुन घ्यावे.

३. सदर उपक्रमांकरीता होणारा खर्च, प्रत्येक वित्तीय वर्षात संबंधित लेखाशिर्षाखाली कार्यालयीन खर्चासाठी मंजूर होणाऱ्या तरतूदीतून भागविण्यात यावा.

४. सदर परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून, त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१५०२२५१६०५०७५८३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकीत करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Aparna Arvind Gawde

Digitally signed by Aparna Arvind Gawde
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Deputy Secretary, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Aparna Arvind Gawde
Date: 2015.02.25 19:11:00 +05'30'

(अपर्णा अ.गावडे)
उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. मा.राज्यपालांचे सचिव,
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव,
३. सर्व मा.मंत्री यांचे स्वीय सहायक,
४. सर्व मा.राज्यमंत्री यांचे स्वीय सहायक,
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई,
६. निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई,
७. शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव,
८. महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मंत्रालय, मुंबई (दूरदर्शन / आकाशवाणी / वृत्तपत्रे / भित्तीपत्रके या माध्यमातून विस्तृत प्रसिध्दी देण्यासाठी)
९. सर्व मंत्रालयीन विभाग (त्यांच्या अधिपत्याखालील सर्व कार्यालयांना सूचना देण्याबाबत)
१०. सर्व विभागीय आयुक्त,
११. सर्व जिल्हाधिकारी,
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१३. भाषा संचालक, भाषा संचालनालय, बांद्रा, मुंबई,
१४. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई,
१५. अध्यक्ष / सचिव, महाराष्ट्र राज्य विश्वकोश निर्मिती मंडळ, मुंबई,
१६. संचालक / प्रशासकीय अधिकारी, राज्य मराठी विकास संस्था, मुंबई,
१७. मराठी भाषा विभाग / सर्व कार्यासने,
**१८. निवड नस्ती (भाषा-३).**